महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

☑ वर्ष १७ वे ☑ फेब्रु. - मार्च २०२३

## हितगूज



वसुली... ग्राहकांनी दरदिवशी वापरलेल्या विजेपोटी आपले वीजबिल नियमित भरणे ही आपल्यादृष्टीने वीजबिलांची वसुली. परंतु, न होणाऱ्या वसुलीमुळे आजही काही विभागात आपल्याला उन्हाताणात जीवाचे रान करत फिरावे लागत असते. या वसुलीसाठी कठीण परिश्रम घ्यावे लागत असतात. बदलणाऱ्या हवामानामुळे आता फेब्रुवारीपासूनच कडक उन्हाळा तापायला लागला आहे. यावर्षीच्या उन्हामुळे सर्वसामान्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असतांना आपल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या उन्हाची तमा न बाळगता मोठ्या जिकरीने वसुलीच्या कामात स्वत:ला झोकून दिले. त्याचेच परिणाम म्हणून विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातही वीजबिलांच्या वसुलीमध्ये मोठा बदल होऊन या भागातही वसुलीचे प्रमाण विशेष लक्षणीय ठरले आहे. अशाप्रकारे घेतलेल्या कठीण परिश्रमामुळेच आपण मागील दहा वर्षातील सर्वाधिक म्हणजेच ७ हजार ७१४ कोटींची वसुली करण्यात यशस्वी झालो आहोत. ही कामगिरी आपण केलेल्या कामांची फलश्रृती असून यासाठी आपणा सर्वांचे अभिनंदन. आपण सर्वजण या कंपनीचे घटक असून आपणच ही उल्लेखनिय कामगिरी पार पाडली आहे. वीजबिलांची वसुली ही आपल्यासाठी निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे येणाऱ्या महिन्यातही आपल्याला वसुलीच्या मोहीमेत कोणताही खंड पडणार नाही, याची काळजी घ्यावी लागणार आहे. वीजबिलांच्या वसुलीसोबतच वीजचोरांविरूध्द सातत्याने राबविण्यात आलेल्या मोहिमेमुळे होणाऱ्या वीजहानीला आळा बसला असून वसुलीचे उद्दीष्ट साध्य करण्यातही मोठी मदत झाली.

यावर्षी फेब्रुवारीचा महिना सुरू असतानाच कडक उन तापायला लागले होते. त्याअनुषंगाने मार्च महिन्यातही आणखी कडक उन तापण्यास सुरूवात झाली. मागच्या वर्षी २४ मार्च रोजी २४ हजार ४०० मेगावॅट इतकी मागणी होती. मात्र यावर्षी २४ मार्चला २४ हजार ८९३ मेगावॅट इतक्या मागणीचा उच्चांक नोंदवला आहे. यावर्षी फेब्रुवारी, मार्च महिन्यापासून वीज मागणीचा आलेख सारखा उंचावत असून यावर्षी वीजमागणी नवीन विक्रम गाठणार की काय असे वाटत आहे. बदलत्या हवामानामुळे आता फेब्रुवारी ते जून ही चारपाचही महिने अधिक उष्णतेचे झाले असून दिवसेंदिवस विजेच्या मागणीत लक्षणीय वाढच होतांना दिसून येत आहे. वाढणाऱ्या विजेची मागणी महावितरणला कधीही पूर्ण करणे शक्य असले तरी या वाढलेल्या वीजमागणीपोटी करावा लागणारा खर्च कसा भागवायचा हा प्रश्न नेहमीच आपल्यासमोर निर्माण होत आहे.

राज्यामध्ये मार्च २०२२ पासून १ लाख ८० हजार १०४ कृषिपंपाच्या वीजजोडण्या प्रलंबित आहेत. पैशाचा भरणा करून प्रलंबित यादीमध्ये असलेल्या शेतकऱ्यांना मार्च-२०२३ पर्यंत वीजजोडण्या देण्यात याव्यात असे निर्देश मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. मा. ऊर्जामंत्री यांनी दिलेल्या निर्देशाची पुर्तता करण्यासाठी प्रलंबित यादीत असलेल्या शेतकऱ्यांना वीजजोडण्या देण्यात येणाऱ्या सर्व अडचणींवर मात करीत आपण २०२२-२३ या वर्षभरात कृषिपंप वीजजोडणी धोरण-२०२० अंतर्गत मार्च २०२३ पर्यंत एक लाख ३४ हजार ८२३, ग्राहकाधिष्टीत वितरण प्रणालीद्वारे ११ हजार १२१, ग्राहकांस बिलामधून परतावा द्यावा लागणाऱ्या योजनेमधून ३ हजार ५२९ (नॉनडीडीएफसीसीआरएफ) जिल्हा वार्षिक योजनेमधून ४ हजार ३९०, उच्चदाब वितरण प्रणालीतून १० हजार ५९४, मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजनेद्वारे १४८ तर इतर योजनांमधून ५ हजार ६५८ अशा एकूण एक लाख ७० हजार २६३ कृषिपंपाना वीजजोडण्या देण्यात आपण यशस्वी झालो आहोत. कृषिपंपाना वीजजोडण्या देण्याची ही मागील दहा वर्षातील सर्वोत्तम कामगिरी आहे. आता कृषिपंपाना वीजजोडण्या देण्याचे कामास चांगली गती मिळाली असून ही गती यापुढेही कायम ठेवावी लागणार आहे. आपल्या सर्वांच्या सामुहिक प्रयत्नांमुळेच प्रलंबित यादीतील शेतकऱ्यांच्या कृषिपंपाना वीजजोडण्या देण्याच्या संख्येमध्ये घट होऊन ती एक लाख ६ हजार ३४० इतकी झाली आहे. ही देखील आतापर्यंतची एका आर्थिक वर्षातील प्रलंबित यादीची सर्वात कमी संख्या आहे. तरीही कृषिपंपाना वीजजोडण्या देण्यामध्ये काही अडचणी असल्यास क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्या स्पष्टपणे माझ्याकडे सांगाव्यात. मागील वर्षभरात कृषिपंपाना वीजजोडण्या देण्यासोबतच वीजबिलांची चांगली वसुली करण्यात सर्वांनी उत्तम कामगिरी बजावली आहे. यापुढेही तुम्हाला या कामामध्ये झोकून देऊन कामगिरी बजावावी लागणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांना आतापर्यंत वीजजोडण्या दिल्या आहेत त्यांची माहिती संगणक प्रणालीमध्ये अद्ययावत करून त्यांना वेळेत वीजबिल दिली जातील व त्या वीजबिलांची काही प्रमाणात का होईना वसुली देखील करायची आहे, याकडेही सर्वांना लक्ष देण्याची गरज आहे.

ग्राहकांना २४ X ७ वीजपुरवठा करतांना नियमितपणे वीजबिलांची वसुली आलीच. आपल्यासाठी बाराही महिने वसुलीचीच आहेत ही बाब आपण कायम लक्षात ठेवली पाहिजे. या वसुलीवरच आपल्या कंपनीचा कार्यभार अवलंबून आहे. वर्षातील एखाद्या महिन्यातच चांगली वसुली करून चालणार नाही. यात आपल्याला कायम सातत्य ठेवावे लागणार आहे. जानेवारी, फेब्रुवारी व मार्च महिन्यातील वसुली ही आपल्या दृष्टीने फारच महत्वाची आहे. विशेषत: शासकीय कार्यालये, पाणी पुरवठा योजना, पथदिवे व इतर खाजगी आस्थापनांकडे असलेले विजेचे बिल हे फेब्रुवारी अथवा मार्च महिन्यात भरण्याचा कल सर्वत्र दिसून येतो. त्यामुळे अशा ग्राहकांकडून थकबाकीसह चालू वीजबिले भरून घ्यावीत. यासोबतच विशेषत: लघुदाब वर्गवारीतील सर्व प्रकारच्या ग्राहकांकडील वीजबिलांची वसुली ही नियमितपणे झालीच पाहिजे याकडेही सर्व सबंधितांनी जाणीवपूर्वक लक्ष द्यावे. ग्राहकांना पुरविलेल्या विजेपोटी मिळणारा महसुल हेच एकमेव आपल्या उत्पन्नाचे साधन आहे. त्यामुळे कोणत्याही ग्राहकांकडे कुठल्याही प्रकारची थकबाकी राहणार नाही, याकडे सर्वांनी कसोशीने लक्ष द्यावे आणि ही काळजी आपण घेणार असा मला विश्वास आहे.

**विजय सिंघल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

# छतांवरील सौरऊर्जा निर्मितीसाठी महावितरणला राष्ट्रीय पुरस्कार



'रूफ टॉप सोलर' योजनेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल पुरस्कार स्वीकारताना श्री. चंद्रमणी मिश्रा

घराच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती करण्याच्या 'रूफ टॉप सोलर' योजनेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल महावितरणला इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेने विजेता जाहीर केले असून नवी दिल्ली येथे नुकताच पुरस्कार प्रदान करण्यात आला.

माजी केंद्रीय ऊर्जा सचिव श्री अनिल राजदान व ईआरइडाएचे माजी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री के. एस.पोपली यांच्याहस्ते महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री. चंद्रमणी मिश्रा यांनी 'रूफ टॉप सोलर' योजनेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल महावितरणतर्फे पुरस्कार स्विकारला. अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांनी या पुरस्कारासाठी महावितरणच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स या कोलकतास्थित संस्थेची स्थापना १९२५ साली उद्योगपती जी. डी. बिर्ला यांच्या नेतृत्वाखाली झाली. देशातील अनेक प्रतिष्ठित व मोठे उद्योगसमूह या चेंबरचे सदस्य आहेत. चेंबरने नवी दिल्ली येथे हरित ऊर्जेविषयी चर्चा करण्यासाठी आयोजित शिखर परिषदेत हरित ऊर्जा क्षेत्रातील देशभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत विविध वर्गवारीतील पुरस्कार प्रदान करण्यात आले.

घराच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून निर्माण झालेली वीज स्वत: वापरायची आणि जास्त निर्मिती झाली तर महावितरणला विकायची अशी 'रूफ टॉप सोलर', योजना आहे. या योजनेला ग्राहकांची पसंती मिळाली आहे. राज्यात रूफ टॉप सोलर बसविणाऱ्या ग्राहकांची संख्या ७९,५६४ झाली होती व त्यांच्याकडून १३८७ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता गाठली गेली होती.

राज्यामध्ये पाच वर्षांपूर्वी २०१६ –१७ या आर्थिक वर्षात घरगुती रूफ टॉपचे केवळ १,०७४ ग्राहक होते व २० मेगावॅट सौरऊर्जा निर्मिती क्षमता होती. गेल्या पाच वर्षांत त्यामध्ये मोठी वाढ झाली आहे व १,३८७ मेगावॅटची क्षमता गाठली गेली आहे. चालू आर्थिक वर्षात एप्रिल २०२२ नंतर आतापर्यंत ३५६ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेची भर पडली आहे.

सौरऊर्जा निर्मितीसाठी रूफ टॉप सोलर योजनेत ग्राहकांना केंद्र सरकारकडून मोठे अनुदान मिळते. सौरऊर्जेतून निर्माण होणाऱ्या विजेमुळे ग्राहकाला नेहमीचा वीजपुरवठा कमी वापरावा लागतो व वीजबिलात कपात होते. ग्राहकाच्या सौर पॅनेलमधून त्याच्या वापरापेक्षा जास्त वीज निर्माण झाली तर ती महावितरणच्या ग्रीडमध्ये पाठवली जाते व कंपनी त्या विजेच्या मोबदल्यात वीजबिलात सवलत देते. सोलर पॅनेल बसविण्याचा खर्च चार ते पाच वर्षांत भरून निघतो पण त्यांचा उपयोग पंचवीस वर्षे होत राहतो. यामुळे ही योजना लोकप्रिय झाली आहे. या योजनेमुळे वीजबिलात बचत होण्यासोबत पर्यावरण रक्षणाला मदत होते.

# मराविमं अधिकारी संघटनेचे अधिवेशन संपन्न




मराविमं अधिकारी संघटनेच्या ४५ व्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी मंचावर उपस्थित मान्यवर.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेची सदस्य संख्या ही या कंपन्यातील एकुण कर्मचाऱ्यांच्या तुलनेत अल्प असली, तरी अधिकारी संघटनेच्या सभासदांचे ऊर्जा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान असून व्यवस्थापनात त्यांची भूमिका या कंपन्यांसाठी श्वासाचे काम करते असे प्रतिपादन महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी केले.

अमरावती येथे नुकत्याच झालेल्या ४५ व्या राज्यव्यापी अधिवेशनाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. या अधिवेशनाचे उद्घाटन डॉ. दिलीप पांढरपट्टे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला महावितरणचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादीकर, महावितरणचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. भूषण कुलकर्णी, महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधिकारी संघटनेचे अध्यक्ष श्री. प्रविण बागुल, सरचिटणीस श्री. संजय खाडे, संघटन सचिव श्री. प्रविण काटोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना श्री. गमरे म्हणाले, राज्यातील ऊर्जा क्षेत्रातील महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या कंपन्याचे काम हे देशात सर्वोत्तम आहे. ऊर्जा क्षेत्रात पुढील काळात ५० हजार कोटीची कामे होणार आहेत. त्यातून ग्राहकांप्रती कर्मचारी व अधिकाऱ्यांची जबाबदारी प्रचंड वाढणार आहे. यावेळी बोलताना अमरावती विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. दिलीप पांढरपट्टे म्हणाले, वीज विभागाचे प्रत्येक कुटूंबाशी नाते आहे. त्यामुळेच प्रचंड कार्यक्षमतेने काम करणारा हा विभाग आहे असे मी मानतो. नागरीकांना या विभागाच्या तांत्रिक अडचणी माहीत नसल्याने टिका सहन करूनही प्रतिकूल स्थितीत काम करून ग्राहकांच्या मनात या विभागाने विश्वास निर्माण केला आहे.

कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादीकर म्हणाले, अधिवेशनाच्या निमित्ताने अनेक विषयावर विचारमंथन होते. वीज क्षेत्रात प्रचंड बदल होत असल्याने अखंडित व गतिमान सेवेसाठी कार्यक्षमतेने वसुली ही ऊर्जा क्षेत्राची गरज आहे. यावेळी महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. भूषण कुलकर्णी म्हणाले, महावितरण ग्राहक सेवेशी संबंधीत असल्याने, बदलत्या काळानुरूप अधिकाऱ्यांनी टेक्नोसेव्ही व्हावे, अधिकाऱ्यांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी व्यवस्थापनाकडून संपूर्ण प्रयत्न राहील.

दोन दिवसीय या अधिवेशनास राज्यभरातून महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील सुमारे पाचशे अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीमती भाग्यश्री वानखेडे यांनी तर आभार संघटनेचे सचिव श्री. फुलसिंग राठोड यांनी मानले.



# अधिकाऱ्यांमध्ये रंगला प्रदर्शनीय क्रिकेट सामना




राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेदरम्यान सांघिक कार्यालय तसेच कोकण प्रादेशिक कार्यक्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संघांत शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेला क्रिकेट सामना बरोबरीत सुटला.

अनुभूती प्रशालेच्या मैदानावर झालेल्या या मैत्रीपूर्ण सामन्यात सांघिक कार्यालयाचे नेतृत्व संचालक (प्रकल्प तथा मानव संसाधन) श्री. प्रसाद रेशमे यांनी तर कोकण प्रादेशिक संघाचे नेतृत्व सहव्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्रकांत डांगे यांनी केले. कोकण संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला.

सलामीवीर व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. नितीन आव्हाड यांच्या शानदार अर्धशतकाच्या (२३ चेंडूत नाबाद ५३ धावा) जोरावर कोकण संघाने निर्धारित १२ षटकांत ३ बाद ११३ धावा केल्या. आव्हाड यांना मुख्य अभियंता श्री. धनंजय औंढेकर यांनी ७, कार्यकारी अभियंता श्री.संदीप शेंडगे यांनी १०, सहव्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्रकांत डांगे यांनी ४, व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. योगेश अमृतकर यांनी १०, जनसंपर्क अधिकारी श्री. ज्ञानेश्वर आर्दड यांनी ८, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. वैभव थोरात यांनी २ व अधीक्षक अभियंता श्री. इब्राहिम मुलाणी यांनी ७ धावा काढून धावसंख्या वाढवण्यास मदत केली. १२ धावा अतिरिक्त निघाल्या. सांघिक कार्यालयातर्फे संचालक (प्रकल्प तथा मानव संसाधन) श्री. प्रसाद रेशमे यांनी २ षटकांत १५ धावा देऊन १ गडी बाद केला तर मुख्य अभियंता श्री. भुजंग खंदारे यांनी २ षटकांत १४ धावा देत २ गडी बाद केले.

प्रत्युत्तरात सांघिक कार्यालयाने सलामीवीर कार्यकारी अभियंता श्री. प्रसाद महातोळे यांच्या नाबाद ४६ धावांच्या जोरावर ११३ धावांचे आव्हान गाठण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सांघिक कार्यालयास शेवटच्या षटकांत १३ धावांची गरज होती. पहिल्या ५ चेंडूत १० धावा निघाल्या. शेवटच्या चेंडूवर ३ धावांचे लक्ष्य असताना २ धावा निघाल्याने रोमहर्षक अवस्थेत अखेर सामना बरोबरीत सुटला. सांघिक कार्यालयाच्या वतीने महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पांडे यांनी १८, संचालक (प्रकल्प तथा मानव संसाधन) श्री. प्रसाद रेशमे यांनी ७, कार्यकारी अभियंता श्री. चेतन वाडे यांनी १४, मुख्य अभियंता श्री. भुजंग खंदारे यांनी १०, कार्यकारी अभियंता श्री. धीरज चव्हाण यांनी ८ तर प्रणाली विश्लेषक श्री. विक्रांत इंगळे यांनी २ धावा काढल्या. कोकण संघातर्फे व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. योगेश अमृतकर यांनी ३ षटकांत २३ धावा देत २ गडी बाद केले तर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. रामगोपाल अहिर यांनी २ षटकांत १५ धावा देत १ गडी बाद केला.

सांघिक कार्यालयाच्या वतीने कार्यकारी संचालक (वितरण तथा मानव संसाधन) श्री. अरविंद भादीकर, मुख्य अभियंता श्री. प्रवीणकुमार परदेशी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांचे विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट, अधीक्षक अभियंता श्री. स्वप्नील काटकर यांच्यासह सांघिक कार्यालय व कोकण प्रादेशिक कार्यालयातील विविध अधिकाऱ्यांनी या सामन्यात सहभाग नोंदविला.

हा सामना पाहण्यासाठी औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. श्री. मंगेश गोंदावले, जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. कैलास हुमणे, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. अनिल कांबळे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. ललित गायकवाड यांच्यासह महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तसेच जळगावचे क्रिकेटप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुमंगल पंचमहाभूत लोकोत्सवात प्रदर्शनीद्वारे सौर जागर



लोकोत्सव प्रदर्शनीत ग्राहकांना माहिती देताना कर्मचारी

कोल्हापूरस्थित श्रीक्षेत्र सिद्धगिरी कणेरी मठ येथे पर्यावरणाच्या पंचतत्वांचे जतन, संरक्षण व संवर्धनासाठी सुमंगल पंचमहाभूत लोकोत्सव आयोजित करण्यात आला. पृथ्वी, अग्नि, तेज, वायु, आकाश या पाच तत्वांपैकी तेज अर्थात ऊर्जा तत्वाबद्दल महावितरणकडून प्रदर्शनी साकारण्यात आली. पर्यावरणपुरक, स्वच्छ व शाश्वत ऊर्जेचा स्त्रोत असलेल्या सौरऊर्जा वापरास प्रोत्साहन मिळावे, या हेतूने 'सौर जागर' करण्यात येतो आहे. वीजग्राहक, नागरिक व विद्यार्थी यांचा प्रदर्शनास उत्तम प्रतिसाद मिळाला.

सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सवातील प्रदर्शनीतून घरगुती ग्राहकांसाठी ४० टक्के अनुदान असलेली केंद्र सरकारची रुफटॉप योजना, शेतीला दिवसा वीज मिळावी, यासाठी राबविण्यात येत असलेली मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना या योजनांचा प्रामुख्याने प्रचार-प्रसार करण्यात आला. त्यासोबतच बचत हिच वीज निर्मिती या सुत्रानुसार विजेचा कार्यक्षम वापर व वीजबचत, महावितरणच्या ऑनलाईन ग्राहकसेवा, गो ग्रीन ही पर्यावरणपूरक सेवा, सुरक्षित वीजवापर, ग्राहकांनी नियमित वीज बिल भरावे, वीजचोरी रोखणे या विषयासंदर्भात जनजागृती करण्यात आली. देशाची ऊर्जा क्षेत्रातील प्रगतीबाबत चित्रफीत प्रसारित करण्यात आली.

### महावितरणच्या कामाचे कौतुक

सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सवासाठी सुरळीत वीज पुरवठा व्हावा, याकरिता महावितरणकडून जलदगतीने विद्युत सुविधांची उभारणी करण्यात आली. याबद्दल मुख्यमंत्री मा.ना.श्री.एकनाथ शिंदे, पालकमंत्री मा.ना.श्री.दीपक केसरकर यांनी महावितरणच्या कामाचे कौतुक केले.

# विजेलाही मिळते शाबासकी..!!




उटी (बु.) येथील शाळेच्या कम्पाऊंड वॉलवरील महावितरणचा गौरव करणारे टिप्पण.

राज्यात चांगली वीज सेवा देणारी सरकारी कंपनी म्हणून महावितरण नावारूपाला येताना दिसते. याची अनेक उदाहरणे सांगता येतील. त्यापैकी नेमकेपणाने सांगायचे झाले तर, उटी(बु.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची (ता. औसा, जिल्हा लातूर) भिंत बोलकी आहे.

उटी हे गाव सुमारे दोन-अडीच हजार लोकवस्तीचे. ते स्वछता, आरोग्य, रस्ते विकास व शिक्षणाच्या बाबतीत संपन्न आहे. २०२२ मध्ये उटी हे जिल्हा पातळीवर स्वच्छतेच्या बाबतीत पहिले आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अभिनव गोयल यांनी गावाची पाहणी करून चांगल्या कामगिरीबद्दल गावकऱ्यांचे आणि गावाला सेवा देणाऱ्या यंत्रणेचेही कौतुक केले. उटी गावची ग्रामपंचायत, माजी मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख व्यापारी संकुल आणि जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा लक्ष्यवेधी आहे. शाळा व्यवस्थापनाने शाळेला कम्पाऊंड वॉल बांधले आहे. त्यापैकी एका भिंतीवर अगदी दर्शनी भागात गावातील कौतुकास्पद उपक्रमांची नोंद घेण्यात आली असून त्यातून विविध सेवांबाबत त्या त्या यंत्रणांना शाबासकी देण्यात आली आहे. ''दोन वर्षांत आमच्या शिक्षणाचे वाजले असते बारा.. पण, महावितरणची साथ मिळाल्याने सुरु राहिला ज्ञानाचा झरा...'' अशा मथळयाखाली महावितरणच्या अखंडित वीज सेवेचा जाहीर गौरव करण्यात आला आहे.

उटी हे गाव महावितरणच्या बुधोडा शाखेअंतर्गत आहे. तिथं सहायक अभियंता म्हणून श्री.सुदर्शन बोळेगावे तर जनमित्र वसीम महेबूब पटेल हे कार्यरत आहेत. गावात तारेवर कुठे आकडा नाही, वीजचोरी नाही. तिथं वापरलेल्या विजेच्या देयकांचा भरणा नियमित असतो. गावकरी आणि शाळा व्यवस्थापनाने महावितरणच्या केलेल्या गौरवाबद्दल मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे यांनीही बोळेगावे आणि जनमित्र पटेल यांचे अभिनंदन केले.



श्री. राकेश निर्मळे

# टूर डे १०० सायकल स्वारी श्री. राकेश निर्मळे यांची कामगिरी

टूर डे १०० या जगविख्यात व्हर्च्युअल सायकलींग स्पर्धेच्या चौथ्या पर्वात जयसिंगपूर कार्यालयातील सहाय्यक अभियंता श्री. राकेश निर्मळे हे डायमंड फिनीशर ठरले आहेत. स्पर्धेचे चौथे पर्व नुकतेच संपन्न झाले. त्यांनी विविध आव्हाने असलेल्या पाच टप्प्यांच्या या सायकलींग स्पर्धेत १०० दिवसात ५१४१ किलोमीटर अंतर पुर्ण केले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कर्मचाऱ्यांचे प्रश्न गतिमानतेने सोडवा : श्री. भूषण कुलकर्णी



आढावा बैठकीत मुख्य महाव्यवस्थापक(मा.सं.) श्री.भूषण कुलकर्णी, मुख्य अभियंता श्री.सचिन तालेवार, उप- महाव्यवस्थापक(मा.सं.) श्री. प्रविण बागूल व इतर.

महावितरण कर्मचारी हा कंपनीचा पाया आहे. महावितरण कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, अडी-अडचणी सोडविण्यासाठी स्थानिक पातळीपर्यंत पाठपुरावा करावा. आधुनिक युगात पेपर विरहित कामे गतिमानतेने करावीत व कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करून कंपनीची प्रतिमा सुधारा असे आवाहन मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. भूषण कुलकर्णी यांनी केले.

औरंगाबाद प्रादेशिक कार्यालय अंतर्गत मराठवाड्यातील औरंगाबाद, लातूर व नांदेड परिमंडलातील मानव संसाधन विभागाची विशेष आढावा बैठक औरंगाबाद येथे पार पडली. त्या प्रसंगी श्री. कुलकर्णी बोलत होते. या प्रसंगी औरंगाबाद पारिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सचिन तालेवार, उप महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. प्रविण बागूल, सहायक महाव्यवस्थापक सर्वश्री सुशील पावसकर, चंद्रकांत खाडे, चेतन वाघ, श्रीमती शिल्पा काबरा, प्रभारी सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील आदींची उपस्थिती होती.

यावेळी श्री. भूषण कुलकर्णी यांनी अनुकंपा तत्वावरील प्रलंबित प्रकरण, कर्मचारी निलंबन, बिंदू नामावली नोंदणी, कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल, कर्मचारी सेवा निवृत्ती उपदान, वार्षिक वेतनवाढ, पदोन्नती पॅनेल, विद्युत सहायक पदोन्नती, सेवानिवृत्ती वेतन, वैद्यकीय देयके, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी नामांकण इत्यादी प्रकरणांचा सविस्तर आढावा घेऊन संबंधित प्रकरणी अधिकाऱ्यांनी स्थानिक पातळीपर्यंत संवाद साधून व पाठपुरावा करून कागद पत्रांची पूर्तता करण्याचे निर्देश दिले. यावेळी औरंगाबाद परिमंडलाने कर्मचाऱ्यांचे रोस्टर १०० टक्के पूर्ण केल्याबद्दल सहायक महाव्यवस्थापक श्रीमती शिल्पा काबरा व त्यांचे सहकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन गौरव केला.

# छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांची गती वाढवा - श्री. राजेंद्र पवार



कार्यक्रमाच्या प्रसंगी उपस्थित मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार, अधीक्षक अभियंता सर्वश्री प्रकाश राऊत, सतीश राजदीप व आदी .

वीजग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी केल्यानंतर तो नेटमीटरींगद्वारे कार्यान्वित करण्यासाठी अभियंता व कर्मचाऱ्यांनी प्राधान्य देत आणखी गती वाढवावी असे निर्देश पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी दिले.

अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी गणेशखिंड येथील विश्रामगृहाच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्पाची ग्रीनर्जी सस्टेनेबल्स एलएलपीचे समीर गांधी व एनर्जिका सोल्यूशन्सचे स्वप्निल बाथे यांच्या सहकार्याने नुकतीच उभारणी करण्यात आली. या प्रकल्पाचे उद्घाटक म्हणून मुख्य अभियंता श्री. पवार बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अधीक्षक अभियंते सर्वश्री प्रकाश राऊत व सतीश राजदीप, महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे (मास्मा) संचालक सर्वश्री समीर गांधी, राजेश मुथा, रवींद्र कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

'मास्मा'चे संचालक श्री. समीर गांधी म्हणाले, 'सौर ऊर्जा प्रकल्पांबाबत इतर राज्यांच्या तुलनेत महावितरणचे काम चांगले आहे. महावितरण व 'मास्मा' यांच्या सहकार्याने सौर ऊर्जा प्रकल्पांना आणखी गती मिळेल. अधीक्षक अभियंता श्री. प्रकाश राऊत यांनीही यावेळी तांत्रिक मार्गदर्शन केले.

महावितरणच्या लघु प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष पटनी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व आभार मानले. यावेळी महावितरणचे अभियंता, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चि. अमेय कुलकर्णी यास अमेरिकेच्या विद्यापीठाचा अवॉर्ड



चि. अमेय अमित कुलकर्णी

अमेरिकेतील बफेलो विद्यापीठाकडून चि. अमेय अमित कुलकर्णी यास 'स्टुडंट अचिव्हमेंट अवार्ड'ने गौरविण्यात आले आहे. चि. अमेय याने या विद्यापीठात शिक्षण घेत 'एमएस'ची पदव्युत्तर पदवी नुकतीच संपादन केली आहे. सोबतच 'एमएस'च्या स्ट्रीममधील उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून 'स्टुडंट अचिव्हमेंट अवार्ड'ने देखील त्यास गौरविण्यात आले आहे. चि. अमेय हा पुणे ग्रामीण मंडल कार्यालयातील कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्री. अमित कुलकर्णी यांचा मुलगा आहे.

# पुणे-बारामती व नागपूर-चंद्रपूर-गोंदियास संयुक्त विजेतेपदाचा मान



राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पुणे-बारामती व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडलास संयुक्तपणे सर्वसाधारण विजेतेपद मिळाले. विजेत्या संघांसोबत सहव्यवस्थापकीय संचालक श्री.चंद्रकांत डांगे, डॉ. श्री. मंगेश गोंदावले, कार्यकारी संचालक श्री. अरविंद भादीकर, मुख्य अभियंता सर्वश्री कैलास हुमणे, राजेंद्र पवार, भुजंग खंदारे व इतर वरिष्ठ अधिकारी.

चारदिवसीय स्पर्धेचा समारोप उद्‌घाटनाप्रमाणेच जल्लोषात झाला. सर्वाधिक ६२ गुण मिळविणाऱ्या पुणे-बारामती व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडलांच्या संघांना सर्वसाधारण विजेतेपद विभागून देण्यात आले. कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्रकांत डांगे यांच्या हस्ते विजेत्यांना करंडक प्रदान करण्यात आला. यावेळी इतर संघ व उपस्थितांनीही टाळ्यांचा गजर व जल्लोष करीत विजेत्या संघांचे कौतुक केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. श्री. मंगेश गोंदावले, कार्यकारी संचालक (वितरण/मानव संसाधन) श्री.अरविंद भादीकर, स्पर्धेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष व मुख्य अभियंते सर्वश्री कैलास हुमणे (जळगाव), भुजंग खंदारे (मुख्यालय), राजेंद्र पवार (पुणे), मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. अनिल कांबळे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पांडे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.ललित गायकवाड यांची उपस्थिती होती. यावेळी अधीक्षक अभियंते सर्वश्री राजेंद्र मार्के (जळगाव), अनिल बोरसे (नंदुरबार), कैलास जमदडे (अहमदनगर), सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नेमीलाल राठोड, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. देवेंद्र कासार, अमित सोनवणे, कार्यकारी अभियंते सर्वश्री अनिरुद्ध नाईकवाडे, रमेशकुमार पवार, प्रदीप सोरटे, राम चव्हाण, एकलव्य क्रीडा संकुलाचे संचालक श्री. श्रीकृष्ण बेलोरकर, अनुभूती शाळेचे क्रीडा संचालक श्री. अरविंद देशपांडे हेही मंचावर होते. श्रीमती अपूर्व वाणी तसेच सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. रामगोपाल अहिर यांनी बक्षीस वितरणाचे सूत्रसंचालन केले. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अरुण शेलकर यांनी आभार मानले.

पाहुण्यांच्या हस्ते सांघिक व वैयक्तिक खेळातील विजेते व उपविजेत्यांना सुवर्ण व रौप्यपदक तसेच प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. राज्यातील १६ परिमंडलांचे नाशिक-जळगाव, औरंगाबाद-लातूर-नांदेड, कल्याण- रत्नागिरी, सांघिक कार्यालय-भांडूप, नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, अकोला-अमरावती, पुणे-बारामती व कोल्हापूर अशा ८ संयुक्त संघांतील ७३० पुरुष व ३५३ महिला असे एकूण १०८३ खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले होते.

**सांघिक खेळांचे अंतिम निकाल - अनुक्रमे विजेता व उपविजेता :**

**क्रिकेट** - पुणे-बारामती व नाशिक-जळगाव,
**व्हॉलिबॉल** - कोल्हापूर व औरंगाबाद-नांदेड-लातूर,
**कबड्डी (पुरुष)** - सांघिक कार्यालय-भांडूप व कोल्हापूर,
**कबड्डी (महिला)** - सांघिक कार्यालय-भांडूप व पुणे-बारामती,
**खो-खो (पुरुष)** - पुणे-बारामती व कोल्हापूर,
**खो-खो (महिला)** - सांघिक कार्यालय-भांडूप व कोल्हापूर,
**टेबल टेनिस (पुरुष)** - नागपूर-चंद्रपूर-गोंदिया व कोल्हापूर,
**टेबल टेनिस (महिला)** - अकोला-अमरावती व कोल्हापूर,
**बॅडमिंटन (पुरुष)** - नागपूर-चंद्रपूर-गोंदिया व औरंगाबाद-नांदेड-लातूर,
**बॅडमिंटन (महिला)** - पुणे-बारामती व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया,
**कॅरम (पुरुष)** - नागपूर-चंद्रपूर-गोंदिया व पुणे-बारामती,
**कॅरम (महिला)** - नागपूर-चंद्रपूर-गोंदिया व कोल्हापूर,
**ब्रिज- औरंगाबाद** - नांदेड-लातूर व नाशिक-जळगाव,
**टेनिक्वाईट महिला** - नागपूर-चंद्रपूर-गोंदिया व औरंगाबाद-नांदेड-लातूर.

**वैयक्तिक खेळांचे अंतिम निकाल (कंसात संघ) - अनुक्रमे विजेते व उपविजेते पुढीलप्रमाणे**

**१०० मीटर धावणे** - पुरुष गट - साईनाथ मसने (सांघिक कार्यालय-भांडूप) व गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती), महिला गट - प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) व सरिता सरोटे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया)

**२०० मीटर धावणे** - पुरुष गट - गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) व साईनाथ मसने (सांघिक कार्यालय-भांडूप), महिला गट - सारिता सरोटे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) व भूमिका भोयर (कोल्हापूर),

**४०० मीटर धावणे** - पुरुष गट - विजय भारे (नाशिक-जळगाव) व प्रदीप वंजारे (कोल्हापूर), महिला गट - श्वेतांबरी अंबाडे (औरंगाबाद-नांदेड-लातूर) व अश्विनी शिंदे (सांघिक कार्यालय-भांडूप),

**८०० मीटर धावणे** - पुरुष गट - प्रतीक वाईकर (पुणे-बारामती) व परेश चौधरी (नाशिक-जळगाव), महिला गट - श्वेतांबरी अंबाडे (औरंगाबाद-नांदेड-लातूर) व प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप),

**१५०० मीटर धावणे** - पुरुष गट - प्रतीक वाईकर (पुणे-बारामती) व शुभम मात्रे (अकोला-अमरावती), महिला गट- अर्चना भोंग (पुणे-बारामती) व प्रेरणा रहाटे (सांघिक कार्यालय-भांडूप),

**५००० मीटर धावणे** - पुरुष - प्रफुल्ल राऊत (कल्याण-रत्नागिरी) व सचिन खटावकर (कोल्हापूर),

**४ बाय १०० रिले** - पुरुष गट - प्रदीप वंजारे, शुभम निंबाळकर, नरेश सावंत, संभाजी जाधव (कोल्हापूर) व प्रतीक वाईकर, सोमनाथ कांतीकर, कृष्णा लाड, गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती), महिला गट - प्रिया पाटील, सोनिया मिठबावकर, अश्विनी शिंदे, सारिका जाधव (सांघिक कार्यालय-भांडूप) व सुप्रिया लुंगसे, अर्चना भोंग, शर्वरी तिवटणे, माया येळवंडे (पुणे-बारामती),

**गोळा फेक** - पुरुष गट - प्रवीण बोरावके (पुणे-बारामती) व हणमंत कदम

(कोल्हापूर), महिला गट – स्नेहा सपकाळ (सांघिक कार्यालय–भांडूप) व पूजा ऐनापुरे (कोल्हापूर),

**थाळी फेक** – पुरुष गट – प्रवीण बोरावके (पुणे–बारामती) व धर्मेश पाटील (नाशिक–जळगाव), महिला गट– ज्योती कांबळे (कोल्हापूर) व संगीता यादव (औरंगाबाद–नांदेड–लातूर),

**भाला फेक** – पुरुष गट – सचिन चव्हाण (कोल्हापूर) व नारायण मुंजाळ (औरंगाबाद–नांदेड–लातूर), महिला गट – सरिता सरोटे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व अश्विनी जाधव (कोल्हापूर),

**लांब उडी** – पुरुष गट – सोमनाथ कांतीकर (पुणे–बारामती) व मनोज धोंडगे (नाशिक–जळगाव), महिला गट – सरिता सरोटे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व माया येळवंडे (पुणे–बारामती),

**उंच उडी** – पुरुष गट – चेतन केदार ( नाशिक–जळगाव ) व महेश नागटिळक (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया), महिला गट – सोनाली मोरे (सांघिक कार्यालय–भांडूप) व अश्विनी देसाई (कोल्हापूर),

**बुद्धिबळ** – पुरुष गट – अजय पंडित (पुणे–बारामती) व सौरभ माळी (कोल्हापूर), महिला गट – अमृता जोशी (सांघिक कार्यालय–भांडूप) व मोना बरेला (नाशिक–जळगाव),

**कॅरम** – पुरुष गट – अनंत गायत्री (सांघिक कार्यालय–भांडूप) व इक्बाल खान (औरंगाबाद–नांदेड–लातूर), महिला गट – तेजश्री गायकवाड (सांघिक कार्यालय–भांडूप) व पुष्पलता हेडाऊ (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया),

**टेनिक्वाईट** – महिला एकेरी – लीना पाटील (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व मनीषा चौकसे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया), महिला दुहेरी – शीतल नाईक– कोमल सुरवसे (पुणे–बारामती) व पल्लवी गायकवाड–भाग्यश्री कदम (औरंगाबाद–नांदेड–लातूर),

**टेबल टेनिस** – पुरुष एकेरी – रितेश सव्वालाखे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व शकील शेख (कोल्हापूर), पुरुष दुहेरी – रितेश सव्वालाखे – प्रमोद मेश्राम (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व मंगेश प्रजापत–कैलास जमदडे (नाशिक–जळगाव), महिला एकेरी – स्नेहल बढे (अकोला–अमरावती) व अश्विनी शिंदे (सांघिक कार्यालय–भांडूप), महिला दुहेरी– स्नेहल बढे–मनीषा बुरांडे (अकोला–अमरावती) व अश्विनी शिंदे–सायली कांबळे (सांघिक कार्यालय–भांडूप),

**बॅडमिंटन** – पुरुष एकेरी – पंकज पाठक (औरंगाबाद–नांदेड–लातूर) व लोकेश तळवेकर (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया), पुरुष दुहेरी – पंकज पाठक–चेतन चौधरी (औरंगाबाद–नांदेड–लातूर) व इम्रान तासगावकर–गणेश काकडे (पुणे–बारामती), महिला एकेरी – वैष्णवी गांगारकर (पुणे–बारामती) व ऋतिका नायडू (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया), महिला दुहेरी – वीणा सगदेव– ऋतिका नायडू (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व विदुला पाटील–चैत्रा पै (कोल्हापूर),

**ब्रिज** – पंकज आखाडे–महेश मेश्राम (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व प्रशांत गोंधळेकर–प्रशांत गायकवाड (अकोला–अमरावती),

**कुस्ती** – ५७ किलो – आकाश लिंभोरे (पुणे–बारामती) व गोरख रानगे (कोल्हापूर), ६१ किलो – विनोद गायकवाड (अकोला–अमरावती) व सुखदेव पुजारी (कोल्हापूर), ६५ किलो – राजकुमार काळे (पुणे–बारामती) व सूर्यकांत गायकवाड (नाशिक–जळगाव), ७० किलो – उत्तम पाटील (कोल्हापूर) व महादेव दहिफळे (औरंगाबाद–नांदेड–लातूर), ७४ किलो –गुरुप्रसाद देसाई (औरंगाबाद–नांदेड–लातूर) व अकील मुजावर (पुणे–बारामती), ७९ किलो – संदीप नेवारे (अकोला–अमरावती) व युवराज निकम (कोल्हापूर), ८६ किलो – अमोल गवळी (पुणे–बारामती) व भूषण चौधरी (नाशिक–जळगाव), ९२ किलो – वैभव पवार (पुणे–बारामती) व महेंद्र कोसारे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) , ९७ किलो – मोहंमद अन्वर (अकोला–अमरावती) व प्रमोद ढेरे (कोल्हापूर) आणि १२५ किलो – भानुदास विसावे (नाशिक–जळगाव) व हणमंत कदम (कोल्हापूर).

# जनसंपर्क अधिकारी श्री. विकास आढे 'आदर्श अधिकारी' पुरस्काराने सन्मानित



मुख्य अभियंता श्री. दीपक कुमठेकर यांच्या हस्ते गौरव स्वीकारताना श्री. विकास आढे, सोबत मान्यवर.

दैनिक नवराष्ट्र, नाशिक आवृत्तीच्या वर्धापन दिनानिमित्त नवराष्ट्र सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये विविध क्षेत्रात कार्यरत अधिकारी व व्यक्तींचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला होता. नाशिक परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी श्री. विकास आढे यांची 'आदर्श अधिकारी' सन्मानासाठी निवड करून त्यांना गौरविण्यात आले. हा गौरव म्हणजे आजपर्यंत केलेल्या कामाची पोहोच पावती असल्याची भावना श्री. आढे यांनी व्यक्त केली.

या गौरवाबद्दल नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दीपक कुमठेकर यांच्या हस्ते जनसंपर्क अधिकारी श्री. विकास आढे यांना पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सर्वश्री सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) लक्ष्मण वसावे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) महेश बुरंगे, कार्यकारी अभियंता श्री. धनंजय आहेर, उपमुख्य औदयोगिक संबंध अधिकारी श्री. प्रमोद राजेभोसले उपस्थित होते.

# श्री. कृष्णा काळदाते यांना पीएच.डी. प्रदान



श्री. कृष्णा गणपतराव काळदाते

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने वाणिज्य विषयात श्री. कृष्णा गणपतराव काळदाते यांना नुकतीच पीएच डी प्रदान केली आहे. प्राचार्य डॉ. अशोक श्रीरामे यांच्या मार्गदर्शनाखाली 'ए स्टडी ऑफ इंटरप्रिनियरशिप डेव्हलपमेंट इन बॅकवर्ड क्लासेस इन द जालना डिस्ट्रिक्ट' या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला. श्री.काळदाते हे औरंगाबाद शहर मंडलांतर्गत वाळूज उपविभागात निम्नस्तर लिपिक (लेखा) या पदावर कार्यरत आहेत. या यशाबद्दल औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक श्री. सचिन तालेवार, प्रभारी सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# राज्यभरात पहिला लाईनमन दिन उत्साहात साजरा

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार वीज वितरण व्यवस्थेतील महत्वपूर्ण घटक असलेल्या जनमित्रांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ४ मार्चला राज्यभरातील सर्व कार्यालयात पहिल्या लाईनमन दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम करण्यात आले. स्वत:च्या जीवाची पर्वा न करता काम करणाऱ्या लाईनमनच्या ऋणातून थोडेफार उतराई होण्यासाठीच लाईनमन दिवसाची स्तुत्य संकल्पना उदयास आल्याची भावना सर्वच कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमात काम करतांना घ्यावयाची काळजी याबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात आले. लाईनमन दिनानिमित्त सर्व जनमित्रांचा पुष्प गुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

## कल्याण परिमंडल –

### महावितरणच्या वाटचालीत जनमित्रांचा वाटा सिंहाचा ! - श्री. चंद्रकांत डांगे

स्वत:च्या घरातील प्रकाशाची फिकीर न करता ग्राहकांच्या घरातील उजेड कायम ठेवण्यासाठी समर्पक भावनेने काम करणारे जनमित्र अर्थात लाईनमन हे अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे धनी आहेत. तत्कालिन वीज मंडळ आणि त्यानंतरच्या महावितरणच्या वाटचालीत या जनमित्रांचा सिंहाचा वाटा आहे, असे गौरवोद्‌गार कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीस संचालक श्री. चंद्रकांत डांगे (भाप्रसे) यांनी काढले.



यावेळी व्यासपीठावर कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. धनंजय औंढेकर, अधीक्षक अभियंता सर्वश्री दीपक पाटील व दिलीप भोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लाईनमनची ओळख असलेला खाकी गणवेष परिधान करून कार्यक्रमाला हजेरी लावत जनमित्रांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला.

यावेळी सहायक महाव्यवस्थापक श्री. धैर्यशील गायकवाड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. रामगोपाल अहिर, कार्यकारी अभियंते, उपकार्यकारी अभियंते, सहायक अभियंते, कर्मचारी व जनमित्र या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता श्रीमती स्मीता काळे यांनी केले. पालघर व वसई मंडल कार्यालयांसह दूर्गम भागातील उपविभागीय कार्यालयांमध्ये लाईनमन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

## भांडुप परिमंडल –

### भांडुप परिमंडलात 'लाईनमन दिवस' उत्साहाने साजरा

भांडुप परिमंडल व ठाणे मंडळाने संयुक्तपणे विकास कॉम्प्लेक्स उपविभागीय कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून कोकण प्रादेशिक विभागाचे सह–व्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्रकांत डांगे (भा.प्र.से. ) यांच्यासह मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. राजेंद्र पांडे, भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे, अधीक्षक अभियंता श्री अरविंद बुलबुले व सहाय्यक महाव्यवस्थापक (मा सं) सौ. हविषा जगताप, कार्यकारी अभियंता सर्वश्री देवेंद्र उंबरकर, नितीन थिटे इतर वरिष्ठ अधिकारी व लाईनमन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य कार्यालयाचे महाव्यवस्थापक (मा.सं ) श्री. राजेंद्र पांडे यांनी जनमित्रांचे कौतुक केले व त्यांना आपल्या कुटुंबाच्या भल्यासाठी सरकारने आणलेल्या विविध सुविधांचा लाभ घेण्याबाबत प्रेरित केले. भांडुप परिमंडलचे मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे यांनी जनमित्रांना काम करत असतांना एकमेकांमधला संवाद किती महत्वाचा आहे याबाबत सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, ठाणे मंडळाचे उच्चस्तर लिपिक श्री. दिलीप वाघमारे यांनी केले. लाईनमन यांनी घेत असलेली मेहनत आणि परिश्रम दर्शविण्यासाठी चित्रफित दाखवण्यात आली. परिमंडलाअंतर्गत मंडल, विभाग, उपविभाग अंतर्गत विविध कार्यालयात लाईनमन दिन साजरा करण्यात आला.

## औरंगाबाद परिमंडल –

### औरंगाबाद परिमंडलात लाईनमन दिवस उत्साहात साजरा

औरंगाबाद परिमंडल कार्यालयात लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक श्री. सचिन तालेवार यांनी जनमित्रांना शुभेच्छा संदेश दिला. सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्रीमती शिल्पा काबरा, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता सर्वश्री सतीश खाकसे, प्रेमसिंग राजपूत, महेश पाटील यांनी लाईनमन दिवसाच्या शुभेच्छा देऊन जनमित्रांच्या कामाचा गौरव केला.



अध्यक्षीय समारोप करताना औरंगाबाद शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री.प्रकाश जमधडे म्हणाले, सुरळीत वीजपुरवठ्याबरोबरच कंपनीची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी वीजबिल वसुलीच्या कामातही जनमित्रांनी पुढाकार घ्यावा. जनसंपर्क अधिकारी श्री.ज्ञानेश्वर आर्दड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

## अमरावती परिमंडल –

### अमरावती परिमंडलातील जनमित्रांचा गौरव

मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात तसेच अधीक्षक अभियंते श्री दिलीप खानंदे व श्री सुरेश मडावी यांच्या पुढाकाराने आणि कार्यकारी अभियंते सर्वश्री आनंद काटकर, अनिरूध्द आलेगावकर, प्रशांत काकडे, संजय खंगार, संजय आडे, नरेंद्र खंगार यांच्या प्रमुख उपस्थितीत परिमंडलात लाईनमन दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



परिमंडलाअंतर्गत असलेल्या अमरावती व यवतमाळ मंडल कार्यालयातील जिल्हा, विभाग व उपविभागानुसार गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. लाईनमनच्या कामाची घेतलेली दखलीचा उत्सव विविध ठिकाणी उत्स्फुर्तेने घेतलेल्या कार्यक्रमातून आणि जनमित्रांच्या मनोगतातून दिसले. यावेळी अचलपूर आणि यवतमाळ विभागात रक्तदान शिबिराचे, तर पुसद विभागात ह्रदय रोग तज्ञ आणि स्त्रीरोग तज्ञाचे मार्गदर्शन घेण्यात येऊन जनमित्रांना सुरक्षा किटचे वाटप करण्यात आले.

## नांदेड परिमंडल –

### सुरक्षेला प्राधान्य देत ग्राहकाभिमूख सेवा द्या - मुख्य अभियंता अनिल डोये

लाईनमनने आपल्या सुरक्षेला प्राध्यान्य देत ग्राहकाभिमूख सेवा देण्याच काम करत कंपनीच्या आर्थिक स्थैर्यासाठी संपुर्ण कार्यक्षमतेने कार्यरत रहावे असे मत व्यक्त करत मुख्य अभियंता श्री अनिल डोये यांनी लाईनमन दिनाच्या सर्व लाईनमनला शुभेच्छा दिल्या.



यावेळी विद्युत भवन येथे अधीक्षक अभियंता श्री. सुधाकर जाधव यांच्या प्रमूख उपस्थितीत दोनशे लाईनमनना पुष्पगुच्छ देवून व सुरक्षेची शपथ घेवून मोठया उत्सहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रास्ताविक श्री प्रमोद देशमूख यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री महेंद्र बागूल यांनी केले. याप्रसंगी नांदेड शहर विभागातील असंख्य अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

## नाशिक परिमंडल –

### नाशिक परिमंडलात लाईनमन दिवस उत्साहात

ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा देण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेले जनमित्र यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत असल्याचे प्रतिपादन नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांनी केले. विद्युत भवनच्या आवारात आयोजित जनमित्रांच्या सत्कार कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

नाशिक परिमंडलातील सर्वच विभागीय व उपविभागीय कार्यालयांमध्ये लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यकारी अभियंता श्री.राजाराम डोंगरे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी प्रमोद राजेभोसले उपस्थित होते. यावेळी पिंपळगाव बसवंत येथील तंत्रज्ञ रवी गोडांबे यांनी निर्मित केलेल्या वीजदेयक थकबाकी वसुली तथा ग्राहकसेवा संदर्भातील चित्रफितीचे विमोचन मुख्य अभियंता श्री. कुमठेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी श्री. विकास आढे यांनी, सूत्रसंचालन व्यवस्थापक श्री. मंगेश गाढे व आभार प्रदर्शन मुख्य लिपिक श्री. सतिश पाटील यांनी केले.



## लातूर परिमंडल –

### लातूर परिमंडलात लाईनमन डे उत्साहात साजरा

लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे यांच्या हस्ते सर्व लाईनमनच्या यथोचित सन्मानाने लाईनमन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर कार्यकारी अभियंते सर्वश्री बी.जी. शेंडगे, प्रदीप पुनसे, गणेश सामसे, उपमुख्य औदयोगिक संबंध अधिकारी श्री.महेंद्र चुनारकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उत्तम रायपल्ले आणि अजित जैन यांनी केले.



बीड मंडलात प्रभारी अधीक्षक अभियंता योगेश निकम यांच्या उपस्थितीत लाईनमन डे साजरा करण्यात आला. धाराशिव जिल्हयातही अधीक्षक अभियंता श्री.सुरेंद्र कटके यांच्या उपस्थितीत हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच लातूर, बीड आणि धाराशिव जिल्हयात मंडल, विभाग आणि उपविभागस्तरावर वेगवेगळया ठिकाणी लाईनमन दिन साजरा करण्यात आला. वेगवेगळया ठिकाणी झालेल्या कार्यक्रमास अधिकारी- कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## अकोला परिमंडल –

### अकोला परिमंडलातील महावितरण जनमित्रांचा गौरव

विद्युत भवन येथे पार पडलेल्या लाईनमन दिनाच्या निमित्ताने अधिक्षक अभियंता

श्री.पवनकुमार कछोट यांच्या हस्ते लाईनमनचा गौरव करण्यात आला. यावेळी कार्यकारी अभियंते सर्वश्री ग्यानेश पानपाटिल, सुनिल कळमकर, विजयकुमार कासट, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.विशाल पीपरे,वरिष्ठ व्यवस्थापक सुमित बोधी प्रामुख्याने उपस्थित होते.

लाईनमनबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी परिमंडलातील अधीक्षक अभियंता सर्वश्री मंगेश वैद्य व बद्रीनाथ जायभाये यांच्या अध्यक्षतेखाली वाशिम आणि बुलडाणा जिल्ह्यातील मंडल, विभाग आणि उपविभागीय कार्यालयात विविध उपक्रम घेत लाईनमन दिवस साजरा करण्यात आला.



## नागपूर परिमंडल -

नागपूर प्रादेशिक व नागपूर परिमंडल कार्यालय असलेल्या विद्युत भवन येथे लाईनमन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागपूर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक श्री.सुहास रंगारी तर नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



या कार्यक्रमात जनमित्रांचा गौरव करण्यात आला. त्यांना सुरक्षिततेची शपथ देण्यात आली. तसेच जे जनमित्र शहीद झाले त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमास महाव्यवस्थापक श्री.शरद दाहेदार, अधीक्षक अभियंते सर्वश्री अविनाश सहारे, हरीश गजबे, अमित परांजपे, उप महाव्यवस्थापक प्रमोद खुळे, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. प्रदीप सातपुते उपस्थित होते.

प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.सचिन लहाने यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्री.अमित पेडेकर यांनी केले. आभार श्री. विवेक बमनोटे यांनी मानले. याचबरोबर परिमंडलात सर्व कार्यालयात हा दिन साजरा करण्यात आला.

## चंद्रपूर परिमंडल -

'लाईनमन' हा वीज वितरण व्यवस्थेमधील अत्यंत महत्वाचा घटक आहेत. तो ऊन, वारा, पाऊस व इतर अत्यंत खडतर परिस्थितीतही ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठ्यासाठी चोवीस तास कार्यरत असतो. यांच्यामुळेच ग्राहकांना वर्षाचे सर्व दिवस अविरत वीज पुरवठा मिळतो, असे मत मुख्य अभियंता श्री. सुनिल देशपांडे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी, विशेष कामगिरी करणारे वरिष्ठ तंत्रज्ञ सर्वश्री विजेंद्र कोटनाके व पुरोहित भिमटे यांचा प्रतिनिधिक सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी चंद्रपूर मंडळाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती संध्या चिवंडे, वरिष्ठ व्यवस्थापक(मा. सं.) श्री.सुशिल विखार, कार्यकारी अभियंता श्री. सुहास पडोळे तसेच अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमानिमित्त अधिकारी व कर्मचारी यांच्यातील ऋणानुबंध सर्वांनी अनुभवला. 'लाईनमन दिन' चंद्रपूर परिमंडलातील सर्व कार्यालयात साजरा करण्यात आला.



## जळगाव परिमंडल -

जळगाव परिमंडलात लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता श्री.कैलास हुमणे म्हणाले की, जनमित्र हा महावितरणचा चेहरा आहे. महावितरणच्या व्यवस्थेमधील तो अत्यंत महत्वाचा घटक आहे. ऊन, वारा, पाऊस व इतर कठीण परिस्थितीत ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठ्यासाठी जनमित्र अहोरात्र परिश्रम करतात.



कार्यक्रमास अधीक्षक अभियंता श्री.राजेंद्र मार्के, कार्यकारी अभियंता श्री.व्ही.बी. पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.अरुण शेलकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री.धीरज बारापत्रे, व्यवस्थापक श्रीमती तन्वी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम परिमंडलातील सर्व कार्यालयात साजरा करण्यात आला.

## कोल्हापूर परिमंडल -

कार्यक्षेत्रात सदैव कार्यमग्न असणारे वीज कर्मचारी, जनमित्र महावितरणचा कणा आहेत. कोल्हापूर, सांगलीच्या जनमित्रांनी महापुराच्या प्रसंगी सुरळीत विजेसाठी युद्धपातळीवर केलेल्या कामाने जगाचे लक्ष वेधले. राष्ट्रीय पातळीवर या कामाची दखल घेतली गेली', असे प्रतिपादन मुख्य अभियंता श्री.परेश भागवत यांनी केले. परिमंडलात आयोजित लाईनमनच्या कौतुक सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी लघु प्रशिक्षण केंद्रप्रमुख श्री. रत्नाकर मोहिते यांनी सुरक्षा प्रशिक्षण दिले. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता श्री. अंकुर कावळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. शशिकांत पाटील, विद्युत निरीक्षक श्री. शकील सुतार, कार्यकारी अभियंते सर्वश्री अभिजीत सिकनीस, सुनिल शिंदे, सुनिल माने, सहाय्यक विद्युत निरीक्षक श्रीमती नाईक यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.भुपेंद्र वाघमारे तर सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी श्री.किशोर खोबरे यांनी केले. लाईनमन दिवस कोल्हापूर परिमंडल कार्यालयासह सर्व कार्यालयांत अनोख्या उपक्रमांनी संपन्न झाला.

# राज्यात विविध ठिकाणी महिला दिन साजरा

*महिलांना त्यांच्या अधिकाराबाबत जागृत करण्यासाठी दरवर्षी जागतिक स्तरावर महिला दिन साजरा करण्यात येतो. समाजात समतेची भावना रुजवण्यासाठी हा दिवस सर्वत्र साजरा केला जातो. राज्यातील महावितरणच्या विविध कार्यालयातही हा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.*




## कल्याण परिमंडल –

कल्याण परिमंडलात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्रकांत डांगे (भाप्रसे) व कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. धनंजय औंढेकर यांच्या हस्ते सर्व महिला अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह आणि गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील नगररचना विभागाच्या सहायक संचालक श्रीमती दिशा सावंत आणि सामाजिक कार्यकर्त्या ॲड. सुजाता अंगडी यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना सहव्यवस्थापकीय संचालक श्री. डांगे म्हणाले, महिलांनी आज प्रत्येक क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध करून दाखवली आहे. मुख्य अभियंता श्री. औंढेकर, सहायक संचालक श्रीमती सावंत आणि सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती अंगडी यांनीही मार्गदर्शन केले.

यावेळी अधीक्षक अभियंता सर्वश्री दीपक पाटील, दिलीप भोळे, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या उप महाव्यवस्थापक श्रीमती सायली झवेरी, मानव संसाधन विभागाचे सहायक महाव्यवस्थापक श्री. धैर्यशिल गायकवाड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. रामगोपाल अहिर, वित्त व लेखा विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. विश्वनाथ कट्टा, कार्यकारी अभियंते, अधिकारी महिला अभियंता, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अनिता चौधरी यांनी केले. तर श्रीमती रेवती धादवड यांनी आभार मानले.

## भांडूप परिमंडल –

भांडूप परिमंडल व ठाणे मंडल यांच्यावतीने महिला कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ठाणे येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्रकांत डांगे (भा.प्र.से) होते. यावेळी भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.सुनील काकडे, अधीक्षक अभियंता श्री. अरविंद बुलबुले व अधीक्षक अभियंता(पायाभूत आराखडा) सौ.शुभांगी कटकधोंड प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातिला बासुरी वादक श्री.रजनीकांत कुंभार यांच्या मधुर बासुरी वादनामुळे संपूर्ण महिलावर्ग मंत्रमुग्ध झाला होता. मार्शल आर्ट्समध्ये वीस वर्षाचा अनुभव असलेल्या सौ. कविता स्वामी यांनी सेल्फ डिफेन्सचे काही सरळ युक्त्या सांगितल्या. कार्यकारी अभियंता श्री. संजय पाटील यांनी महिलांसाठी एक सुंदर कविता सादर केली.

यावेळी प्रत्येक विभागातून चांगल्या काम करणाऱ्या एक महिला तंत्रज्ञाला भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. यामध्ये सौ. वंदना सोनवणे, सौ. पुष्पा चिंतेवार, सौ.दिपाली मोंडे, सौ.संतोषी सावंत व हीना पवार आहेत. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सौ.मनीषा सुरवाडे व सौ. प्रगती घुंगराळेकर यांनी विशेष मेहनत घेतली.

## अमरावती परिमंडल –

मुळात भावनिक असलेली स्त्री ही कुटूंबाच्या कठीण काळातही कुटूंबासोबत खंबीरपणे उभी राहते, त्यागाची भावना, विविध नात्यावरील निस्वार्थ प्रेम अशा अनेक गुणांनी परिपुर्ण असलेल्या स्त्री शक्तीचा सन्मान झालाच पाहिजे. नोकरदार महिलांना कुटूंब आणि कार्यालयीन जबाबदारी सांभाळतांना तारेवरची कसरत करावी लागते.तसेच अनेक नात्यांची जाळे गुंफत असतांना आवश्यक त्या ठिकाणी तडजोडीसाठी पुढाकार घेण्याचे कामही महिलाकडूनच केला जाते, असे प्रतिपादन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले. विद्युत भवन येथे साजरा करण्यात आलेल्या महिला दिनानिमित्त ते बोलत होते.

यावेळी अधिक्षक अभियंता श्री. दिपक देवहाते, कार्यकारी अभियंता श्री. भारतभूषण औघड व श्रीमती प्रतिक्षा शंभरकर, सहायक महाव्यवस्थापक श्री. सुर्यकांत फलटणकर, प्रणाली विश्लेषक श्री. नितीन नांदुरकर, विधी अधिकारी श्री.प्रशांत लहाने उपस्थित होते.

यावेळी कार्यकारी अभियंता श्रीमती प्रतिक्षा शंभरकर यांनी राज्य घटनेत महिलांना असलेल्या अधिकाराची माहिती दिली. प्रतिभा जीवतोडे,वंदना बर्डेकर व वंदना खोब्रागडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहाय्यक महाव्यवस्थापक सुर्यकांत फलटणकर यांनी केले. आभार विधी अधिकारी प्रशांत लहाने यांनी मानले.

## अकोला परिमंडल –

शिक्षणामुळे पुरूषांसाठीच नाही, तर महिलांसाठीही प्रगतीचे दार उघडे झाले आहे. महिलांना त्यांच्या अधिकाराची जाणीव झाली. एकेकाळी मर्यादित जगात वावरणाऱ्या स्त्रीने आज विविध क्षेत्रात आपले कर्तुत्व सिध्द केले असल्याचे प्रतिपादन कार्यकारी अभियंता अश्विनी चौधरी यांनी केले. विद्युत भवन येथील क्रीडा सभागृहात आयोजित जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

महिला दिनानिमित्त संगीत खुर्ची,फुग्यांचा खेळ,धुलीवंदन अशी मनोरंजनात्मक खेळाचेही आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुजा तातया यांनी केले.सूत्र संचालन निकिता रावसाहेब व शिवानी अग्रवाल ह्यांनी केले,तर आभार शुभांगी साबळे यांनी मानले.

## लातूर परिमंडल –

लातूर परिमंडलात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. अधीक्षक अभियंता श्री. मदन सांगळे यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमास उपकार्यकारी अभियंता संध्या ठाकरे, श्रुती हरकुड, सहायक अभियंता पुजा माडे, शितल मरेवाड, उच्चस्तर लिपीक श्रीमती सुषमा खिचडे, अलका मरे, धनश्री शिंदे, यशोदा पालकर, श्रीमती अनुसया पुरी, श्रीमती जाधव आदीसह सहायक महाव्यवस्थापक चंद्रकांत खाडे, कार्यकारी अभियंता बी.जी शेंडगे, प्रदीप पुनसे उपस्थित होते.

## औरंगाबाद परिमंडल -

औरंगाबाद परिमंडल कार्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी श्रीमती मंगल खिवंसरा यांनी महिलांना संरक्षण देणाऱ्या कायद्यांची माहिती दिली. योगतज्ञ डॉ. हर्षदा शेलार यांनी महिलांनी योग्य आहार तसेच नियमित व्यायाम करण्याचा सल्ला दिला. अध्यक्षस्थानी औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक श्री. सचिन तालेवार होते. अधीक्षक अभियंता सर्वश्री प्रकाश जमधडे, संजय सरग, प्रवीण दरोली, उपमहाव्यवस्थापक श्रीमती कांचन राजवाडे, सहायक महाव्यवस्थापक श्रीमती शिल्पा काबरा, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक श्रीमती अश्विनी मदने-सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती प्रज्ञा दिवेकर व प्राजक्ता पगारे यांनी केले. श्रीमती सुप्रिया देशमुख यांनी आभार मानले.

## नागपूर परिमंडल -

नागपूर शहर मंडल कार्यालयाच्यावतीने प्रकाश भवन येथे महिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सल्लगार (ग्राहक व्यवहार) श्रीमती गौरी चंद्रायण अध्यक्षस्थानी होत्या. तर अधीक्षक अभियंता श्री.अमित परांजपे, कार्यकारी अभियंता श्री.राजेश घाटोळे प्रमुख पाहुणे होते. या मान्यवरांच्या हस्ते सर्व महिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विविध मनोरंजन व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता श्रीमती निशा चौधरी यांनी तर आभार प्रदर्शन सहाय्यक अभियंता श्रीमती अस्मिता जयस्वाल यांनी केले.

याचबरोबर जागतिक महिला दिन निमित्ताने नंदनवन उपविभागामध्ये प्रख्यात स्त्रीरोग तज्ञ डॉ. ज्योति दलाल यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोल्हापूर परिमंडल -

कार्यक्षेत्रात विद्युत यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे आव्हानात्मक कामकाज महावितरणच्या दामिनी सक्षमपणे करीत आहेत. ऊर्जाक्षेत्राच्या विकासात महिलांचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन मुख्य अभियंता श्री.परेश भागवत यांनी केले. 'मी तंदरुस्त तर जग तंदरुस्त' हा मुलमंत्र देताना, नोकरी व कौटुंबिक जबाबदारी सांभाळून महिलांनी आपल्या आरोग्याकडे प्राधान्याने लक्ष पुरवावे, असा सल्ला श्री. भागवत यांनी दिला.

यावेळी पोषण आहार तज्ञ डॉ. मिनाक्षी सरोदे यांनी महिलांच्या मानसिक व शारिरीक आरोग्याच्या संदर्भाने महिलांशी सविस्तर संवाद साधला. आर्ट ऑफ लिव्हींगच्या प्रशिक्षक श्रीमती शारदा कापसे यांनी मन:शांतीसाठी प्राणायाम व ध्यानाचे महत्व विशद करुन प्रात्यक्षिक घेतले. सुत्रसंचलन वरिष्ठ व्यवस्थापक (मानव संसाधन) सुमन पाटील तर आभार प्रदर्शन उच्चस्तर लिपीक (मानव संसाधन) मुनिरा शेख यांनी मानले. सांगली मंडल कार्यालयासह विविध ठिकाणी महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी मंचावर सहायक महाव्यवस्थापक श्रीमती स्नेहा पार्टे, कार्यकारी अभियंते सर्वश्री अभिजीत सिकनीस, प्रशांतकुमार मासाळ, सुधाकर जाधव व उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भुपेंद्र वाघमारे यांची उपस्थिती होती.



# औरंगाबाद परिमंडलात शिवजयंती उत्साहात साजरी

औरंगाबाद परिमंडलात छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीतर्फे कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची वेशभूषा स्पर्धा, व्याख्यान, पोवाडा, मशाल रॅली अशा विविध उपक्रमांनी छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक श्री. सचिन तालेवार होते. यावेळी प्रसिद्ध व्याख्याते श्री.राहुल गिरी, ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण दरोली, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. मोहन काळोगे, प्रभारी सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता सर्वश्री सतीश खाकसे, प्रेमसिंग राजूपत, महेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुरुवातीला शिवस्वरांजली शाहिरी कलापथकाचे शाहीर श्री. विलासराजे बडक पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिवरायांच्या जीवनकार्यावर आधारित स्फूर्तीदायी पोवाडे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिवजयंतीनिमित्त यंदाही कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. त्यात पाल्यांनी राजमाता जिजाऊ, शिवराय, ताराराणी व मावळ्यांची हुबेहूब वेशभूषा साकारल्या. या स्पर्धेत बालगटात कस्तुरी उबाळे–प्रथम, ओमराज कावळे–द्वितीय, अद्विक तायडे–तृतीय तर तेजस्वी जाधव व शिवम जाधव यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. मोठ्या गटात ऋतुजा पिवळ व आराध्या पवार– संयुक्त प्रथम, कार्तिक जाधव व साई मेटे–संयुक्त द्वितीय, संजीत जाधव–तृतीय तर स्नेहा काटे, राधिका देशमुख, राणू रिडलॉन, शिवांशी देशमुख, वैष्णवी कावळे, सोहम फाळके, अदिती जाधव यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. गहिनीनाथ वळेकर यांनी केले.

याप्रसंगी कामगार कल्याण मंडळाचा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल यंत्रचालक श्री. रमेश शिंदे व राज्य नाट्य स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल श्रीमती पल्लवी गायकवाड यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिवजयंतीनिमित्त देवगिरी किल्ला ते क्रांती चौकातील शिवरायांच्या पुतळ्यापर्यंत मशाल यात्रा काढून वीजचोरीचे दुष्परिणाम, वीज बचत, वीजबिल भरणा याबाबत जनजागृती केली.



शिवजयंती महोत्सवात बोलताना श्री.राहुल गिरी.
सोबत सहव्यवस्थापकीय संचालक (प्रभारी) श्री.सचिन तालेवार व इतर अधिकारी.

यावेळी प्रमुख वक्ते श्री. राहुल गिरी म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे अठरापगड जातीजमातींना सोबत घेऊन स्वराज्य स्थापन करणारे महापुरुष होते. त्यांच्या जीवनचरित्राचा आदर्श घेऊन नव्या पिढीने वाटचाल करायला हवी. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक श्री. सचिन तालेवार म्हणाले, शिवरायांचे विचार आजही प्रासंगिक आहेत. सर्वांनी त्यांच्या विचारावर चालण्याची गरज आहे. जयंती उत्सव समितीने यावर्षी राबवलेल्या विविध उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.सुनील बनसोड यांनी केले. सहायक अभियंता श्री. राजेंद्र राठोड यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. यावेळी विविध संघटना प्रतिनिधी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर परिमंडलात शिव जन्मोत्सवानिमित्त अकराशे झाडांची लागवड



शिव जयंतीनिमित्त वृक्षारोपण करताना मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे यांच्यासह इतर

लातूर परिमंडल कार्यालय परिसरात शिव जयंतीनिमित्त शिव जन्मोत्सव साजरा करण्यात आला. त्यानिमित्त कार्यालय परिसरातील बागेच्या जागेत ११०० वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच वीज कर्मचाऱ्यांचे रक्तदान शिबीर घेण्यात आले. त्यात ४२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिव जन्मोत्सावाच्या मुख्य कार्यक्रमात मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे आणि रयतेचे राजे छत्रपती शिवराय या विषयावरील व्याख्याता श्रीमती क्षिप्रा मानकर यांच्या उपस्थितीत तांत्रिक महिला कर्मचाऱ्यांचा सन्मानही करण्यात आला. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता सुरेंद्र कटके, कार्यकारी अभियंता बी. जी. शेंडगे, गणेश सामसे व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जळगांव मंडलात शिवजयंती उत्साहात साजरी

बहुजन विद्युत अभियंता, अधिकारी व कर्मचारी फोरमतर्फे जळगाव मंडल कार्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

सुरुवातीला जळगाव परिमंडल कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित सभेत मुख्य वक्ते श्री. मुवेश नेतकर यांनी शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते हे शिवचरित्रातून उलघडून सांगितले. बहुजन फोरमचे जळगाव परिमंडल सचिव श्री. विजय सोनवणे यांनी शिवाजी महाराजांचे कार्य हे समाजामध्ये प्रगती, ऐक्य आणि सामंजस्य यास पोषक होते हे उदाहरण देऊन स्पष्ट केले. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अरुण शेलकर होते. शिवजयंती सोहळ्यास मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

# वाशीमध्ये १२ इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन कार्यान्वित




चार्जिंग स्टेशन सोबत उपस्थित कर्मचारी.

महावितरणने राज्यातील विविध ठिकाणी इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन उभारण्याचे नियोजन केले आहे. याचाच एक भाग म्हणून, वाशी मंडलात १२ नवीन इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन नुकतेच कार्यान्वित करण्यात आले आहेत. सदर चार्जिंग स्टेशन वाशी येथील रघुलीला मॉल, सेक्टर ३० उपकेंद्र, वाशी रेल्वे स्थानक जवळ, सेक्टर २ खारघर उपकेंद्र, सेक्टर १९ई उपकेंद्र, गेलेरीया मॉल जवळ, पामबीच रोड, सेक्टर १५ उपकेंद्र, एरोली उपकेंद्र, पावणे एमआयडीसी, सेक्टर ८ रबाळे एमआयडीसी उपकेंद्र, इंदिरा नगर उपकेंद्र, सेंट्रलरोड, ल्युब्रीऑल कंपनी जवळ, तुर्भे नवी मुंबई, टपाल लाका उपकेंद्र, पनवेल - उरण रोड, टपाल नाका, पनवेल, सेक्टर ५० सिवूड, नवी मुंबई, सेक्टर ९ पामबिच उपकेंद्र, नेरूळ, नवी मुंबई, सेक्टर १५, सीबीडी उपकेंद्र, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, पुढारी उपकेंद्र येथे आहेत.

महावितरणचे चार्जिंग स्टेशन मोबाईल अँप वर शोधणे अतिशय सोपे आहे. ग्राहकांनी मोबाईलमध्ये Powerup अँप इंस्टाल करून MSEDCL चा पर्याय निवडावा. सर्व चार्जिंग स्टेशन रस्त्याच्या लगत आहेत. चार्जिंग स्टेशनच्या प्रांगणात वाहनांच्या चाचणीसाठी सोय उपलब्ध आहे. एका किलो व्हॅटसाठी अत्यंत वाजवी दर आहेत. ग्राहकांनी या चार्जिंग स्टेशनचा लाभ घ्यावा असे आवाहन वाशी मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. राजाराम माने यांनी केले आहे. या कामाबद्दल भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे यांनी वाशी मंडलाचे कौतुक केले.

# वेळेत बिल भरणाऱ्या श्री. शशांक गोळेगावकर यांना ईलेक्ट्रिक स्कुटर



सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले यांच्या हस्ते लकी ड्रॉची स्कुटर श्री. शशांक गोळेगावकर यांना देण्यात आली.

वीजबिल भरण्यास प्रोत्साहन मिळावे आणि दर महिन्याला बिल भरण्याची ग्राहकांना सवय लागावी या उद्देशाने औरंगाबाद प्रादेशिक कार्यालय अंतर्गत येणाऱ्या औरंगाबाद, लातूर व नांदेड परिमंडलातील घरगुती वीजग्राहकांसाठी सुरू करण्यात आलेल्या ''वीज बिल भरा अन बक्षिस मिळवा'' या जाहीर झालेल्या लकी ड्रॉ बक्षिसाच्या इलेक्ट्रिक स्कूटरचे नुकतेच सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले यांच्या हस्ते नांदेडच्या श्री.शशांक शरदराव गोळेगावकर यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. यावेळी ग्राहकांनी देय दिनांक अगोदर वीज बिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले यांनी केले.

मराठवाडयातील वीज ग्राहकांना वेळेवर घरगुती वीज बिले देय दिनांकाच्या अगोदर भरण्याची सवय लागावी यासाठी 'वीज बिल भरा अन बक्षिस मिळवा' ही योजना सुर करण्यात आली होती. ग्राहकांनी वापरलेल्या विजेचे बिल नियमित भरावे यासाठी महावितरण त्यांना वारंवार आवाहन करते. परंतु सर्वच ग्राहक वेळेवर आपली बिले भरत नसल्याने थकबाकी वाढत जाते.बिल तयार झाल्याच्या सात दिवसांत बिल भरल्यास जवळपास एक टक्के तत्पर देयक भरणा सूट मिळते. तसेच ऑनलाईन बिल भरल्यास ५०० रुपयांच्या मर्यादेत ०.२५ टक्के सूट महावितरणतर्फे देण्यात येत आहे.

या कार्यक्रमास प्रभारी महाव्यवस्थापक(वित्त व लेखा) श्री. लक्ष्मीकांत राजेल्ली, उप महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. प्रविण बागूल, उपमहाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्रीमती कांचन राजवाडे, आदींची उपस्थिती होती.




ग्राहकांसोबत नेहमीच चांगला संवाद जोपासणारे कराड विभागाअंतर्गत येणाऱ्या उंब्रज उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. चेतन कुंभार यांनी ग्राहकांना आपली थकबाकी भरण्याचे आवाहन केले होते. या आवाहनास प्रतिसाद देत कायम स्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहक श्री. शंकर दगडू कदम यांनी आपली असलेली संपूर्ण थकबाकी रक्कम रू.९९,३००/- भरली. ग्राहकांनी वापरलेल्या विजेचे बिल भरलेच पाहिजे अशी भावना यावेळी श्री. कदम यांनी व्यक्त केली.



# वीज ग्राहकांना १०० टक्के अचूक वीज बिले द्यावीत

## सहव्यवस्थापकीय संचालक (भाप्रसे) श्री. चंद्रकांत डांगे यांच्या बैठकीत सूचना



आढावा बैठकीत बोलताना सहव्यवस्थापकीय संचालक (भाप्रसे) श्री. चंद्रकांत डांगे. सोबत मुख्य अभियंता श्री. विजय भटकर व इतर.

मीटर रिडींग प्रक्रियेत सुधारणा आणून वीज ग्राहकांना वीज वापरानुसार अचूक वीज बिले देण्याच्या मागील एक वर्षातील नियोजनबद्ध प्रयत्नांना अपेक्षित यश मिळाले आहे. वाढीव, सरासरी वा अंदाजे बिलिंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. वीज ग्राहकांना १०० टक्के अचूक वीज बिल मिळावे. या दृष्टीने मीटर रिडींग प्रक्रिया राबवावी, अशा सूचना सहव्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्रकांत डांगे (भाप्रसे) यांनी आढावा बैठकीत दिल्या. वीज ग्राहकांनी वीज बिले नियमित भरून महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

शेतीच्या प्रलंबित वीज जोडण्या मार्च २०२३ अखेर द्याव्यात, कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकांची तपासणी मोहीम राबवावी, महावितरण ग्राहकांना दैनंदिन वीज खरेदी करून वीज पुरवठा करते. वीज बिल वसूलीतून जमा होणाऱ्या महसुलावर महावितरणची भिस्त आहे. १०० टक्के थकीत वीज बिल वसुली शिवाय पर्याय नाही. तेंव्हा थकीत वीज बिल वसुलीचे उद्दिष्ट साध्य करावे,अशा सक्त सूचना मा. श्री. डांगे यांनी बैठकीत दिल्या.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील आढावा बैठक प्रसंगी मुख्य अभियंता श्री. विजय भटकर, अधीक्षक अभियंता सर्वश्री नितीन पळसुलेदेसाई व विनोद पाटील, कार्यक्षेत्रातील संबंधित सर्व कार्यकारी अभियंता व स्थानिक अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# महावितरणचे राज्याच्या विकासातील योगदान मोलाचे - रविंद्र सावंत

## सेवानिवृत्ती निमित्त आयोजित निरोप समारंभ




संचालक (प्रकल्प/मानव संसाधन) श्री. प्रसाद रेशमे यांच्या हस्ते मावळते संचालक (वित्त) श्री. रवींद्र सावंत यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.

महावितरण कंपनीची वार्षिक उलाढाल ९० हजार कोटीहून अधिक आहे. त्यामुळेच राज्याच्या अर्थकारणामध्ये महावितरणचा मोलाचा वाटा आहे. कोरोना काळानंतर दैनंदिन कामकाजास वित्त पुरवठा कमी पडू नये हे खूप मोठे आव्हान होते, या आव्हानांस अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांच्या नेतृत्वात यशस्वीपणे सामोरे जाता आले. सध्या महावितरणची परिस्थिती नियंत्रांत आहे पण अद्याप खूप कामे बाकी आहे. थकीत बिलांची वसुली होणे गरजेचे आहे. असे मत संचालक (वित्त) श्री. रविंद्र सावंत यांनी व्यक्त केले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमास उत्तर देताना ते बोलत होते.

महावितरण व महानिर्मितीचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड वांद्रे येथे आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे होते. तर महावितरणचे नवनियुक्त संचालक (वित्त) श्री. अनुदीप दिघे, महानिर्मितीचे संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे, महापारेषणचे संचालक(वित्त) श्री. अशोक फळणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. प्रसाद रेशमे यांच्या हस्ते श्री. रविंद्र सांवत यांना शाल, श्रीफळ व गुणगौरव प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे म्हणाले, 'श्री. सावंत हे कोणत्याही कामाचा ताण घेत नाहीत व नेहमीच आनंदी राहतात. त्यांच्या कामाची शैली ही वाखाणण्याजोगी आहे. श्री. सावंत यांनी कोरोना काळात महावितरण कंपनीचा आर्थिक डोलारा चांगल्या प्रकारे हाताळला आहे. खेळते भांडवल उभे करताना कर्जाच्या व्याजाच्या स्वरुपात त्यांनी महावितरणचे कोट्यावधी रुपये वाचवले आहेत. तसेच मंत्रालयातून विविध योजनांची सबसिडी मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे.'

यावेळी कार्यक्रमास महावितरणचे कार्यकारी संचालक (वितरण) श्री. अरविंद भादिकर, कार्यकारी संचालक (वित्त व लेखा) श्रीमती स्वाती व्यवहारे यांच्यासह महानिर्मिती व महापारेषण मधील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल ध्वजारोहण करतांना

# महावितरणमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७३ वा वर्धापन दिन महावितरण व महानिर्मिती कंपन्यांचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे उत्साहात साजरा करण्यात आला. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे, संचालक (वित्त) श्री. रविंद्र सावंत, संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

या कार्यक्रमाला दोन्ही कंपन्यातील वरिष्ठ अधिकारी, अभियंते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरासाठी सुविधेबद्दल

# महावितरणला राष्ट्रीय पुरस्कार



इलेक्ट्रिक वाहनधारकांची गाड्यांच्या चार्जिंगची समस्या सोडविण्यासाठी विकसित केलेल्या सुविधेसाठी महावितरणला 'आयएसजीएफ इनोव्हेशन अ‍ॅवॉर्ड २०२३' हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. महावितरणचे संचालक प्रसाद रेशमे यांनी नवी दिल्ली येथे एका समारंभात हा पुरस्कार स्वीकारला. या यशाबद्दल महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांनी कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

इंडिया स्मार्ट ग्रिड फोरम (आयएसजीएफ) या संस्थेतर्फे २०१७ पासून 'आयएसजीएफ इनोव्हेशन अ‍ॅवॉर्ड' दिले जातात. वीज, पाणी, वायू आणि विद्युत वाहनांच्या क्षेत्रात नवा मानदंड प्रस्थापित करणाऱ्या कंपन्यांना हे पुरस्कार दिले जातात. महावितरणला 'इमर्जिंग इनोव्हेशन इन इलेक्ट्रिक मोबिलिटी डोमेन' या वर्गवारीत विजेता म्हणून पुरस्कार मिळाला.

केंद्र सरकार व राज्य सरकारचे इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण आहे. त्यासाठी महाराष्ट्रात महावितरणला राज्य नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. इलेक्ट्रिक वाहनांसाठी विशेष दर निश्चित करणे, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंगच्या पायाभूत सुविधा विकसित करणे, चार्जिंग स्टेशन उभारणे, वेब पोर्टल विकसित करणे आणि मोबाईल अ‍ॅप विकसित करणे असे विविध पुढाकार महावितरणने हाती घेतले आहेत.

महावितरणने स्वतःची 'इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जिंग स्टेशन्स' उभारण्यासोबतच इलेक्ट्रिक वाहनधारकांसाठी पॉवर अप नावाचे मोबाईल अ‍ॅप विकसित केले आहे. त्याचा वापर करून इलेक्ट्रिक वाहनधारक जवळचे चार्जिंग स्टेशन शोधून काढू शकतो, स्वतः गाडीचे चार्जिंग करू शकतो आणि त्यासाठीचे पैसे ऑनलाईन भरू शकतो. महावितरणच्या चार्जिंग स्टेशनसोबत खासगी चार्जिंग स्टेशनबद्दल माहिती मिळण्यासाठी हे अ‍ॅप उपयोगी पडते. पॉवर अप या मोबाईल अ‍ॅप्लिकेशनमधील 'मॅप मी' या सुविधेच्या आधारे महावितरणच्या तसेच अन्य कंपन्यांच्या चार्जिंग स्टेशनची माहिती मिळते. हे अ‍ॅप मराठी व इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये काम करते. महावितरणला केंद्रीय पद्धतीने सर्व चार्जिंग स्टेशन्सवर देखरेख ठेवणे शक्य होते. आतापर्यंत या अ‍ॅप्लिकेशनवर २५०० खासगी व महावितरणची चार्जिंग स्टेशन्स जोडली गेली आहेत. यापूर्वी आत्मनिर्भर भारत शिखर परिषद स्कोच २०२२ पुरस्काराने या प्रकल्पाचा सन्मान झाला आहे.

महावितरणच्या कार्यालयात आणि सब स्टेशन्समध्ये इलेक्ट्रिक वाहनांची चार्जिंग स्टेशन काही ठिकाणी उभारण्यात आली आहेत व ती मनुष्यबळाशिवाय चालतात. तेथे जाऊन वाहनचालक स्वतः चार्जिंग करून घेऊ शकतो. महाराष्ट्रात महावितरणने इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन्ससाठी विविध ठिकाणी जागा निश्चित केल्या असून चार्जिंग स्टेशन्सची संख्या गतीने वाढविण्याचे नियोजन केले आहे.




**Printed & Published by Shri. Anil M. Kamble** of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574
& **Published at** Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
***The Company accepts no responsibility for the matter published in the journal.***

संपादकः अनिल मु. कांबळे
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)